**ग्रामीण / नागरी पाणीपुरवठा कार्यक्रमाअंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी विश्वासर्ह उद्‌भव निश्चित करणे व त्या आधारे पाणी योजनांना मंजूरी देणे**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रः जसंप्रा-१०९७/प्र.क्र.७२/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २९ नोव्हेंबर, १९९७.**

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण त्याचबरोबर नागरी भागातील पिण्याच्या पाण्याचा कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणीचा साधक-बाधक विचार करुन व योजनांसाठी पाणी अग्रक्रमाने उपलब्ध होण्याकरिता आणि अशा योजना दिर्घकाळ टिकून राहण्याकरिता भुपृष्ठावरील विश्वासार्ह पाणी उद्‌भव आणि भूगर्भातील पाणी उद्‌भवांचा शोध घेऊन योजना राबवाव्या लागतात. अलिकडे राज्यातील काही भागांमध्ये अनेकदा पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होते व त्यामुळे विश्वासार्ह पाण्याचे उद्‌भव मिळणे कठीण होऊन बसते. ही बाब लक्षात घेता पाणी योजना मंजूर करण्यापूर्वी भूपृष्ठावरील पाणी उद्‌भव धरणे, तलाव इ. त्याचबरोबर भूगर्भातील पाणी उद्‌भव लक्षात घेवून त्याचा अग्रक्रमाने पिण्याच्या पाण्यासाठी वापर होण्याच्या दृष्टीने धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**शासन निर्णय :-**

पाणी पुरवठा कार्यक्रमाचे काम गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने भूपृष्ठावरील त्याचबरोबर भूगर्भातील पाणी उद्‌भवाचा शोध प्रथम घेऊन नंतरच योजनांची इतर उपांगे हाती घेण्याचे शासनाचे धोरण आहे. तथापि योजनांची आखणी करताना यासंबंधाने खालील बाबींचा देखील विचार करण्यात यावा :-

१) सर्वसाधारणपणे केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच स्वतंत्र धरणे बांधली जावू नयेत.

२) पाणी पुरवठा योजनेसाठी अस्तित्वात असले किंवा १-२ वर्षात पूर्ण होणारे पाटबंधारे प्रकल्प हेच शक्यतो पाण्याचा विश्वासार्ह उद्‌भव म्हणून घेण्यात यावेत तसेच विश्वासार्हतेवर आधारीत योजना हाती घ्याव्यात.

३) भूपृष्ठावरील पाण्याबरोबरच भूगर्भातील भूजल संपत्तीचा देखील वापर करणे आवश्यक आहे. पाणी उद्‌भवाचा विचार करतांना भूगर्भातील पाणी उद्‌भवावर प्रथम भर द्यावा आणि जर असा पर्याय उपलब्ध नसेल तर भूपृष्ठावरील पाणी उद्‌भवाचा पाणी योजनेसाठी विचार करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सु. ल. तिडके)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सचिव, मुख्यमंत्राचे कार्यालय.
२. खाजगी सचिव, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय.
३. खाजगी सचिव, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सदस्य सचिव, (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई .
७. सदस्य सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई .
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१०. संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, स्वार गेट पुणे.
११. सर्व उपसंचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
१२. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
13. सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.